महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

क्र.मासंवि/रवका/न.क्र.२८३/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

# प्रशासकीय परिपत्रक क्र. ४४५ दि. २० / ०२ / २०१३

विषय : मुख्य महाव्यवस्थापक (वि.व ले.) या पदाकरिता सा.आ.क्र.७४ (क) अनुसार उच्च वेतनश्रेणीचे लाभ विहित करण्याबाबत.

.....

सा.आ.क्र.७४ (क) दिनांक ३०.०४.१९७४ मधील तरतुदींनुसार आणि प्रशासकीय परिपत्रक क्र.३०४ दि.२८.०७.२०१० अन्वये कंपनीत विविध पदावर कार्यरत अधिकारी/कर्मचाऱ्यांना त्यांच्या सेवा कालावधीत उच्च वेतन श्रेणीचे प्रथम, द्वितीय व तृतीय लाभ देण्याबाबतच्या तरतुदी करण्यात आल्या आहेत. तसेच उच्च वेतनश्रेणीचे लाभ देण्याबाबतच्या वेतनश्रेण्याही विहित करण्यात आलेल्या आहेत.

२. या संदर्भात मुख्य महाव्यवस्थापक (वि.व ले.) या पदावर कार्यरत अधिकारी यांना सा.आ.क्र.७४ (क) दि.३०.०४.१९७४ मधील तरतुदींच्या अधीन राहून सदरचा लाभ मंजूर करण्याकरिता वेतनश्रेण्या विहित करण्याबाबतची बाब विचाराधीन होती. आता, व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (वित्त), संचालक (संचलन) आणि संचालक (प्रकल्प) यांचेशी विचारविनिमय करुन मुख्य महाव्यवस्थापक (वि.व ले.) या पदाकरिता उच्च वेतनश्रेणीचे लाभ देण्याबाबतच्या वेतनश्रेण्या विहित करण्याकरिता मंजूरी प्रदान केली आहे.

३. या अनुषंगाने मुख्य महाव्यवस्थापक (वि.व ले.) या पदावर कार्यरत अधिकारी यांना कार्यकारी संचालक या पदाच्या वेतनश्रेणीमध्ये म्हणजेच रु.३९११०-१७२०-७५२३० या वेतनश्रेणीमध्ये सा.आ.क्र.७४ (क) दि.३०.०४.१९७४ मधील तरतुदीनुसार उच्चवेतनश्रेणीचा प्रथम लाभ संबंधीत अधिकारी या पदावर रुजू झालेल्या दिनांकापासून सहा वर्षानंतर मंजूर करण्यात यावा.

४. त्याचप्रमाणे कार्यकारी संचालक या पदाची वेतनश्रेणी ही कंपनीमध्ये अंतीम उच्चतम वेतनश्रेणी असल्यामुळे सा.आ.क्र.७४ (क) दि.३०.०४.१९७४ आणि प्रशासकीय परिपत्रक क्र.३०४ दि.२८.०७.२०१० मधील तरतुदीनुसार द्वितीय व तृतीय लाभाकरिता मुख्य महाव्यवस्थापक व तत्सम पदांवर कार्यरत अधिकारी यांना उच्च वेतनश्रेणी लाभाच्या देय असलेल्या तारखेस (Due date) एक अतिरीक्त वेतनवाढ मंजूर करण्यात यावी.

५. सा.आ.क्र.७४ (क) दि.३०.०४.१९७४ व प्रशासकीय परिपत्रक क्र.३०४, दिनांक २८.०७.२०१० मधील इतर तरतूदी अबाधित राहतील.

६. सदर प्रशासकीय परिपत्रक कंपनीच्या इंट्रानेटवर उपलब्ध करण्यात आले आहे.

सही/-
*( संदेश ए. हाके )*
*मुख्य महाव्यवस्थापक (मासं)*

*D:\O&M\Adm.Cir.F.N.-283 -Grant of G.O.74 CGM(F&A).doc*
*18/02/2012*